# खारघरमध्ये उभे राहणार ३०० खाटांचे प्रशस्त व सर्व सोयीयुक्त रूग्णालय
## -आमदार प्रशांत ठाकूर यांची माहिती

पनवेल (प्रतिनिधी) सिडको हद्दीतील प्रत्येक नोडमध्ये रूग्णांच्या सेवेसाठी रूग्णालयांची आवश्यकता लक्षात घेवून त्यासंदर्भात सिडकोकडे मागणी व सातत्याने पाठपुरावा केला होता. या महत्वपूर्ण मागणीचा सिडकोने विचार करून रूग्णालयांच्या उभारणीसाठी मान्यता दिली असून लवकरच खारघरमध्ये ३०० खाटांचे प्रशस्त व सर्व सोयीयुक्त रूग्णालयाची उभारणी होणार असल्याची माहिती आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी खारघर येथे दिली.

श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि खारघर विभागीय कॉंग्रेस कमिटीच्यावतीने ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार व छत्री वाटप, शालेय विद्यार्थ्यांना मोफत वहयांचे वाटप, महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ तसेच स्पॅगेटी सोसायटीमधील नागरिकांच्या विनंतीवरून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्वखर्चातून स्पॅगेटी सोसायटीमधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण केल्याबद्दल सोसायटीच्यावतीने आमदार प्रशांत ठाकूर यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.त्याप्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

सिडको हद्दीतील शहरांना व गावांना योग्य त्या पायाभूत सोयीसुविधा मिळाल्या पाहिजेत यासाठी सिडकोकडे पाठपुरावा केला आहे त्यानुसार त्या त्या विभागात विकासकामे करण्यात येत आहे. नागरिकांचे प्रश्न आपले प्रश्न आहेत याची जाणिव ठेवून कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून काम केले जात असून खारघर ग्रामपंचायतीने आमदार निधी वापरायला नकार दिला असला तरी आपल्या वैयक्तीक खर्चातून खारघरमध्ये विकासकामे केली जात आहेत असे सांगून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असून मी त्यांचा मुलगाच नव्हे तर सच्चा कार्यकर्ताही आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पनवेलमधील पाच महत्वपूर्ण रस्त्यांचे कॉंक्रीटकरण, नावडे फाटा व ज्युन्या मुंबई-पुणे महामार्गावरील कळंबोली लोखंड बाजार येथे उडडाणपूल, तक्का गाढी नदी ते पळस्पे फाटा व कळंबोली ते खांदा कॉलनी राष्ट्रीय महामार्गाचे रूंदीकरण व सुधारणा अशी पनवेलच्या दृष्टीने महत्वाच्या विकासकामांसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी एमएमआरडीएच्या माध्यमातून १६१ कोटी रूपयांचा निधी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडून मंजूर करून घेतला. पनवेलच्या विकासासाठी आमदार प्रशांत ठाकूर दिवसरात्र एक करून करून काम करीत असून त्याला नागरिकांचा पाठिंबा आणि चांगला प्रतिसाद लाभत आहे.

या कार्यक्रमास ज्येष्ठ नेते तथा खारघर कॉंग्रेसचे प्रभारी वाय.टी.देशमुख, खारघर अध्यक्ष अनंता तोडेकर, कार्याध्यक्ष सुनिल सावर्डेकर, महिला अध्यक्षा कुंदा मेंगडे, ॲड.जे.पी.खारगे, रूपाली जैन, उमेश पाटील, साधना पवार, प्रियदर्शनी सोसायटीचे अध्यक्ष कोशी वर्गीस, सचिव सचिन सावंत, खजिनदार दिनेश करकेरा यांच्यासह कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.